## • जैन धर्म :

जैन धर्म हा वैदिक धर्माएवढा प्राचीन आहे. जिनाला परमपूज्य मानणाऱ्यांचा किंवा जिनाने ज्या धर्माचे कथन अथवा उपदेश केला तो धर्म म्हणजे जिन धर्म, ज्याने समस्त इंद्रिये व अज्ञान यावर विजय प्राप्त करून सम्यक ज्ञान प्राप्त करून घेतले तो जिन होय. जो राग, द्वेष, मोहरूपी या शत्रूंना जिंकतो तो व जो जैन धर्मात केवल अवस्थेत पोहोचतो त्या व्यक्तीला जिन म्हणतात. वर्धमान महावीरांना या विकारांवर विजय प्राप्त झाला. सामान्यतः जैनामध्ये २४ निरर्थक होऊन गेले. जीन म्हणजेच तिर्थकर होय, जैन धर्माचे दुसरे नाव अर्हत धर्म आहे.

**• जैन धर्माची प्राचीनता :**

काही विद्वानांनी जैन धर्म खूप प्राचीन मानला गेला आहे. या धर्माची परपरा, विकास सिंधू संस्कृतीशी जोडतात. जैन धर्माचा संबंध सिंधू संस्कृतीतील पशुपती यांच्या बरोबर जोडतात. तर काही विद्वान जैन धर्माचा उदय ऋग्वेदकाळात झाला असे मानतात. ऋग्वेदाच्या मंत्रामध्ये जैन धर्माचे प्रथम तीर्थंकर ऋषभ देवाचा उल्लेख आहे. विष्णू व भगवान पुराणात ऋषभदेवाला ब्राह्मण धर्मातील विष्णूचा अवतार असे म्हटले आहे. यजुर्वेदामध्ये अजितनाथ तीर्थंकरांचा उल्लेख आहे.

**• जैन धर्मातील तीर्थकराची संकल्पना-परंपरा :**

जैन धर्म हा तीर्थंकर धर्म आहे. तीर्थ म्हणजे धर्म-धर्माचे प्रगटीकरण, प्रवर्तन करणारे महापुरुष म्हणजे तीर्थंकर प्रकटीकरण, प्रवर्तन करणारे महापुरुष म्हणजे तीर्थंकर होत. धर्माचे निरुपण करणारे, सर्वसंगपरित्याग करून ज्यांनी शरीर, मन, इंद्रिये, वाणी यांना जिंकले आहे ते तीर्थंकर त्याच्या उपदेशाप्रमाणे आचरण करणारे ते जैन देवापेक्षाही तीर्थंकरांचा दर्जा श्रेष्ठ असे.

जैन धर्मामध्ये २४ तीर्थंकर होऊन गेले. जैन धर्माला यशाच्या शिखरावर नेण्याचे कार्य २३ वे तीर्थंकर पार्श्वनाथ व २४ वे तीर्थंकर महावीर यांनी केले. या जैन धर्मातील २४ तीर्थकर पुढीलप्रमाणे- १) ऋषभदेव, २) आदीनाथ, ३) संभव, ४) अभिनंदन, ५) सुमती, ६) पद्मप्रथा, ७) सुपार्श्व,८) चंद्रप्रभू, ९) सुविधी, १०) शीतल, ११) श्रेयांस, १२) वासुपूज्य, १३) विमल, १४) अनंत, १५) धर्म,१६) शांती, १७) कुथ, १८) अमर, १९) मल्ले, २०) मुनिसबीर, २१) नमी, २२) अरिष्ट नेमी, २३) पार्श्वनाथ, २४) वर्धमान महावीर.

**• ऋषभदेव :**

जैन धर्माचा संस्थापक म्हणून पहिले तिर्थंकर ऋषभदेवांना मानतात. ऋग्वेदाच्या मंत्रामध्ये जैन धर्माचे प्रथम तिर्थंकर म्हणून ऋषभदेवाचा उल्लेख आहे. ज्यावेळी मानव प्रथम अवस्थेत होता त्यावेळी ऋषभदेवानी लोकाच्यामध्ये जागृती निर्माण केली. काही काळ चक्रवर्ती सम्राट म्हणून काम केले. काही घटनांमुळे त्यांना वैराग्य आले. त्यामुळे त्यांनी राज्यकारभाराचा त्याग केला. अरण्यात जाऊन घोर तपश्चर्या केली. तेथे त्यांना 'केवलज्ञान' प्राप्त झाले. त्यानंतर त्यांनी ज्ञानाचा उपदेश केला. त्यांना तीर्थंकर म्हटले जाऊ लागले. त्यातून जैन धर्माचा उदय झाला. त्यांनी जैन धर्माची अहिंसा, सत्य, अस्तेय व अपरिग्रह ही चार तत्त्वे सांगितली.

**• पार्श्वनाथ**

जैन धर्माचे २३ वे तिर्थकर म्हणून पार्श्वनाथ यांना मानले जाते. यांचा जन्म महाविरांच्या पूर्वी २५० वर्षे झाला असून ते वाराणसीचे राजे अश्वसेन यांचे पुत्र होते. ते क्षत्रीय होते. त्यांच्या मातेचे नाव वामादेवी होते. त्यानी २० वर्षे गृहस्थधर्म सांभाळला आणि त्यानंतर त्यांनी तपश्चर्या करून कैवल्यज्ञान प्राप्त केले आणि आपल्या ज्ञानाचा प्रसार केला. याच पार्श्वनाथाचे कार्य २५० वर्षांनी वर्धमान महावीरानी पुढे नेले.

**• वर्धमान महावीर (इ.स.पू. ५९९ ते ५२७) :**

जैन धर्माचे २४ वे शेवटचे तिर्थंकर म्हणून वर्धमान महावीर ओळखले जाते. याचा जन्म इ.स.पू. ५९९ मध्ये वैशाली नगरच्या कुंदग्राम या उपनगरात झाला. त्यांचे वडील सिद्धार्थ हे बृज्जी संघाचे प्रधान होते, तर आई त्रिशलादेवी ही वैशालीचा राजा चेटक यांची बहिण होती. त्यामुळे वर्धमान यांना राजघराण्याचा वारसा लाभला होता. परंतु ऐहिक सुखामध्ये त्याचे मान रमेनासे झाले. त्यातच त्यांच्या वयाच्या ३० व्या वर्षी आई बडीलांनी उपोषण, व्रतवैकल्ये करतच देहत्याग केला. यामुळे ही महावीर विरक्त बनले. त्यांनी आपले वडील बघू नंदीवर्धन याची संमती घेवून महावीरांनी सन्यास धर्म स्विकारला.

**• धर्मविचारांचा प्रसार**

ज्ञानप्राप्ती झाल्यानंतर महावीरांनी ३० वर्षे प्रवास करून जैन धर्म विचाराचा प्रसार केला. लिच्छवीचीराजकन्या पद्मावती ही महावीरांची पहिली शिष्या होती. मगध राजा विविसार व अजातशत्रू श बनले. विदेह, मिथिला, अंग, मगध व कोसल इ. राज्यांमध्ये त्यांनी जैन धर्माचा मोठ्या प्रमाणावर प्रसार केला. त्यांनी एकूण १४ हजार शिष्य मिळविले. प्रवचने, संवाद व वादविवाद यादवारे त्यांनी जनतेमध्ये

मोठे परिवर्तन पडवून आणले. वयाच्या ७२ व्या वर्षी इ.स.पू. ४६७ मध्ये पटणा जिल्हयातील राजगृहाजवळ 'पाया' दे महावीरांचे महानिर्वाण झाले.

**जैन धर्म पंथ :**

जैन धर्मात दोन पंथ निर्माण झाले. याशिवाय अनेक उपपंथ ही होते. त्यातील श्वेतांबर व दिगंबर है देन पंथ महत्वाचे आहेत. हे पंथ इ.स.पू. तिसन्या शतकात निर्माण झाले,

**१) दिगंबर पंथ :**

दिगंबर म्हणजे आकाश हे ज्याचे वस्त्र आहे. हा सनातन पंथ असून महाविरांना थोर आत्मा पुरुष मानतात. या पंथाचे अनुयायी यत्र वापरत नाहीत, यांना मूर्तीपूजा मान्य नाही. यांच्या मते खीला मोक्ष प्राप्ती होत नाही. से करपात्रात भोजन करतात. हे अनुयायी चिंतन, मनन, ध्यान धारणा, जप तप करतात, लोकभाषा म्हणून अर्धमागधीचा वापर. यांचे प्रमुख ग्रंथ संस्कृत भाषेत आहेत. केवल ज्ञानच अंतिम ज्ञान मानतात. या पंथाचा प्रामुख्याने दक्षिणेत प्रसार होता.

**२) श्वेतांबर पंथ :**

श्वेतांबर म्हणजे शुभ्र वस्त्रधारी होय. हा पंथ परिस्थितीनुसार बदलणारा सुधारणावादी पंथ होता. हे ईश्वरास मानतात व मूर्ती पूजेस यांची मान्यता आहे. खीला केवलप्राप्ती होऊ शकते. तसेच मुक्तीसाठी नग्नता आवश्यक नाही असे त्यांचे मत होते. जेवणासाठी ते काही उपकरणे व पात्रे वापरतात. एकोणीसावे तीर्थंकर मल्ली ही सी आहे मानतात. मूर्तीला वस्त्रे घालतात, पुजेच्यावेळी मूर्तीला फुले वाहून मिठाईचा नैवेद्य दाखवितात. याचे बहुसंख्य ग्रंथ अर्धमागधी भाषेत होते. याही पंथाचा प्रसार दक्षिण भारतात मोठ्या प्रमाणावर झाला.
वरील दोन्ही पंथांच्या विवेचनावरून असे दिसते की, विचारांच्या मतभेदातून हे पंथ निर्माण झाले. मात्र मूलतत्त्वाच्या बाबतीत या दोन पंथामध्ये फारसे भेद नाहीत. मूर्तीपूजा करावी किंवा करू नये यावर मतभेद आहेत.

**• जैन धर्म ग्रंथ :**

जैन धर्मात जे प्रमुख ग्रंथ आहेत त्यांना 'आगम' असे म्हटले जाते. आगम म्हणजे उपदेश महावीरांनी केलेल्या प्रवचनातून जैन विचारांचा उपदेश केला. त्यातून जैन धर्म व तत्त्वज्ञानाची निर्मिती झाली. जैन धर्माचे मूळ धार्मिक ग्रंथात बारा भाग होते. बरेच विद्वान, साहित्यीक व आचार्य यांनी अनेक ग्रंथांची रचना केली. जैन धर्मग्रंथ अर्धमागधी (प्राकृत) व संस्कृत भाषेत तयार झाले. आचार्य हेमचंद्र यांनी तर्कशास्त्र, शब्दकोश, काव्यशास्त्र, योगशास्त्र व इतिहासावर प्रचंड ग्रंथ रचले. जैन साहित्यात हेमचंद्र सूरी यांना सर्वश्रेष्ठ स्थान आहे. यांचा 'परिशिष्टपर्व' हे ग्रंथ विशेष प्रसिद्ध आहे.

**जैन धर्माचे योगदान :**

**१) नैतिक आचरण व अहिंसेचा सिद्धांत :**

महावीरांनी दैनदिन जीवनात नैतिक आचरण व सदाचारावर भर दिल्याने जैन धर्म साधा, सरळ व नैतिकता या सिद्धांताने परिपूर्ण बनला. तसेच त्यातील अहिंसेच्या सिद्धांतामुळे वैदिक धर्मातील पशुहत्या व नरबळी बंदी झाली. पुढील काळात या सिद्धांताचा प्रभाव महात्मा गांधीजींच्या राष्ट्रीय आंदोलनात दिसते. त्यामुळे ही सर्वात मोठी देणगी 'अहिंसा' सिद्धांत होय.

**२) वैदिक धर्मास विरोध व सामाजिक समतेचा पुरस्कार :**

जैन धर्माने वैदिक धर्मातील कर्मकांडाला विरोध करून सर्व जातीतील लोकांसाठी धर्माची दारे खुली केली व समाजिक समतेचा पुरस्कार केला.

**३) कला, स्थापत्य व साहित्य क्षेत्रातील योगदान :**

शिल्पकला, स्थापत्य, मूर्तीकला, चित्रकला व साहित्य या क्षेत्रात महत्त्वाचे योगदान दिले आहे. इतर धर्माप्रमाणेच जैन धर्माने धर्माच्या प्रसारासाठी कलेचा आश्रय घेतला. खजुराहो मंदिर, वेरूळची लेणी, अंबेजोगाई लेणी, गिरनार, पावापूरी, राजगृह येथील मंदिरे, श्रवण बेळगोळ येथील बाहूबलीची प्रचंड मूर्ती या स्थापत्य आणि कलाकृतींनी भारतीय सांस्कृतीक जीवनात महत्त्वाचे योगदान दिलेले आहे. तसेच साहित्याच्या क्षेत्रात काव्य कादबरी, नाट्य अशा ललित वाङ्मयामध्ये मोठी भर घातली. व्याकरण, काव्य, कोश, रसायनशास्त्र, छंदशास्त्र, गाथा, गणित, योगशास्त्र इत्यादी विषयांवर जैन लेखकांनी मोलाची ग्रंथरचना केली. याशिवाय हिंदी, मराठी, राजस्थानी भाषेत मोलाची ग्रंथरचना केली. याशिवाय हिंदी, मराठी, राजस्थानी, गुजराती, तमीळ व तेलगू जैन साहित्याची निर्मिती केली.

वरील सर्व योगदानामुळे जैन धर्म प्राचीन भारताच्या इतिहासात एक महत्त्वाचा धर्म ठरला व आजही त्यांचे अस्तित्व टिकून असल्याचे दिसून येते..

**जैन धर्माचे तत्त्वज्ञान**

जैन हा शब्द 'जिन' या संस्कृत शब्दापासून तयार झाला आहे. ज्याने आपल्या इंद्रियांना, विकारांना जिंकले तो जिन किंवा जितेंद्रिय, जैन धर्म म्हणजे ज्यांनी स्वतःच्या इंद्रियांना जिंकले आहे त्यांचा धर्म.जैन महामुनींना निग्रंथ म्हणतात. निग्रंथ म्हणजे ग्रंथींना जिंकणारा, सांसारिक बंधनातून मुक्त होणारा. जैन धर्माच्या प्रवर्तकांना, संस्थापकांना तीर्थंकर म्हणतात. तीर्थ म्हणजे सांसारिक बंधनातून मुक्त होण्यासाठी सांगण्यात आलेले नियम कर म्हणजे करणारा तीर्थकर म्हणजे असे महापुरुष की जे सर्वसामान्यांना सांसारिक बंधनातून मुक्त होण्याचा मार्ग दाखवतात.

महावीर जैन यांनी त्यांच्या पूर्वी होऊन गेलेल्या विशेषतः २३ वे तीर्थंकर पार्श्वनाथ यांनी सांगितलेल्या तत्त्वज्ञानात थोडी फार भर घालून त्या विचारांना शास्त्रशुद्ध पाया दिला. तत्कालीन समाजातील दोष दूर करून 'बहुजन हिताय, बहुजन सुखाय अशी समाजव्यवस्था निर्माण करण्याचा प्रयत्न महावीर जैन यांनी केल्याने ते धर्मसुधारक मानले जातात. महावीर जैन यांनी ज्या सिद्धांतांचा प्रचार केला ते सिद्धांत म्हणजे जैन धर्मा तत्त्वे होत. जैन धर्माचे तत्त्वज्ञान ज्या ग्रंथात लेखबद्ध करण्यात आले आहे त्या अर्थाना 'आगम' म्हणतात वैदिक धर्मियांना वेट जितके पवित्र व पुजनीय वाटतात तितकेच जैन धर्मियांना आगम पवित्र व पुजनीय वाटतात.

**जैन धर्माचे तत्त्वज्ञान**

जैन धर्म ही वैदिक किंवा ब्राह्मण धर्माच्या विरुद्ध असलेली एक प्रतिक्रिया मानली जाते. ब्राह्मण धर्माविरुद्ध प्रजेत असलेला असंतोष दूर करून तिला धार्मिक समाधान देण्यासाठी जैन धर्म निर्माण झाला. त्यामुळे या धर्माची जी शिकवणूक किंवा तत्त्वज्ञान आहे त्याचे सरळ सरळ दोन भाग पडतात. एक बुद्धिजीवी वर्गासाठी सांगण्यात आलेले तत्त्वज्ञान आणि दोन सर्वसामान्य माणसाला व्यावहारिक जीवन चांगल्या पद्धतीने जगता यावे म्हणून सांगण्यात आलेले सदाचाराचे नियम. त्यामुळे जैन तत्त्वज्ञानाचे स्पष्टपणे दोन भाग पडतात. एक सैद्धांतिक आणि दोन व्यावहारिक.

**१) सैद्धांतिक तत्त्वज्ञान**

**निवृत्तीपर धर्म** –

जैन धर्मात मनुष्य हा जन्म आणि मृत्यूच्या भयाने आक्रांत दर्शविला आहे. यानुसार शरीर हे नश्वर, क्षणभंगूर, निरर्थक आणि भौतिक आहे. यासाठी शरीराच्या सुख व भोगाकडे आकर्षित होता कामा नये. खरे सुख हे संसाराचा उपभोग घेण्यात नसून संसारत्यागांत आहे. म्हणून जैन धर्मात सांगितले आहे की -समाज, कुटुंब, संपत्तीचा त्याग करा, भिक्षु बना आणि सर्वदूर संचार करा. हा धर्म कर्मवादी नसून अकर्मवादी आहे. या धर्माच्या मते मानवी जीवन हे भोग आणि वासना यांनी व्यापलेले जलाशय आहे. या जलाशयात कितीही विहार केला तरी मानवाला तृप्ती लाभत नाही. त्याचे असमाधान सतत वाढून नवीन दुःखे निर्माण होतात. त्यासाठी मोहमयी जीवनाचा त्याग करून, संन्यस्त वृत्तीने राहून, इंद्रियांवर ताबा मिळवून, तपाचरणाद्वारे कैवल्य प्राप्त करण्यावर हा धर्म भर देतो. सारांश जैनधर्म हा प्रवृत्तीपर नसून निवृत्तीपर आहे.

**कर्मवाद आणि पुनर्जन्म** –

जैन धर्म ईश्वराचे अस्तित्व नाकारतो. या धर्मानुसार मनुष्य हाच त्याच्या भाग्याचा कर्ता असतो. तो त्याच्या धार्मिक व सांसारिक क्रियाकलापासाठी स्वयं जबाबदार असतो. कर्मामुळेच मनुष्याला सुख-दुःख भोगावी लागतात. कर्म हेच जन्म व मृत्यूचे कारण आहे. कर्मामुळेच पुनर्जन्म होतो. सांसारिक मनुष्य आठ प्रकारच्या कर्मांनी पीडित असतो. हे कर्मच त्याच्या पुनर्जन्माला कारणीभूत होतात.

१) ज्ञानावरणीय कर्म - हे कर्म आत्म्याचे खरे स्वरूप जाणून घेण्याच्या कार्यात बाधा उत्पन्न करते.

२) दर्शनावरणीय कर्म - हे कर्म आत्म्याची सम्यक दर्शनशक्ती थोपवून धरते.

३) वेदनीय कर्म - सुख व दुःखाच्या सम्यक ज्ञानात हे कर्म बाधा निर्माण लोटते..

४) मोहमयी कर्म - हे कर्म जिवाला मोहित करून त्याला दुःखात

५) आयुकर्म - मनुष्याची आयु निर्धारित करणारे कर्म.

६) नामकर्म - मनुष्याची गती, शरीर आणि स्थिती ठरविणारे कर्म.

७) गात्रकम - मनुष्याचे गोत्र व श्रेष्ठ व कनिष्ठ दर्जा ठरविणारे कर्म.

८) अंतरायकर्म - सत्कर्मात बाधा उत्पन्न करणारे कर्म. कर्मबंधच मनुष्याला पुनर्जन्म देतात. म्हणूनच जैन धर्मात स्पष्टपणे म्हटले आहे की केलेल्या कर्माचे फळ भोगल्याशिवाय मनुष्याला जन्म-मृत्यूच्या फेऱ्यातून सुटका मिळत नाही. त्यामुळे मोक्षप्राप्तीसाठी कर्मविन्मुख होणे आवश्यक आहे.

**जीव-अजीव**

जैन धर्मानुसार सृष्टीतील सर्व द्रव्यांना दोन भागांत विभाजित करण्यात आले आहे. अस्तिकाय आणि नास्तिकाय काळाच्या व्यतिरिक्त सर्व द्रव्य अस्तिकाय आहेत. अस्तिकाय म्हणजे असे द्रव्य की जे शरीराप्रमाणे पृथ्वी किंवा आकाशात स्वतःचे अस्तित्व कायम ठेवतात. जीव हे आत्म्याचेच दुसरे नांव आहे. याव्यात प्राण आहे किंवा जो जीवित आहे तो जीव. जीव हा निसर्गतःच पूर्ण असून त्यात अनंत ज्ञान, अनंत श्रद्धा, अनंत शांती आणि अनंत वीर्य आहे परंतु पुद्गल (अजीव) शी त्याचा संयोग झाला की त्या काळापुरते त्याच्यातील विशेष गुण लुप्त होतात. जैन धर्मात जीव दोन प्रकारचे मानण्यात आले आहेत. मुक्त आणि अमुक्त किंवा बद्ध. मुक्त जीव म्हणजे ज्यांना कर्मापासून मुक्ती मिळाली ते आणि बद्ध जीव म्हणजे जे अजूनही कर्मबंधनात अडकलेले आहेत, सांसारिक पाशात गुरफटलेले आहेत. बद्ध किंवा अमुक्त जिवाचे दोन प्रकार मानले गेले आहेत. त्रस आणि स्थावर. त्रस हे गतिमान तर स्थावर हे गतिहीन असतात. त्रस जिवात दोन, तीन, चार आणि पाचपर्यंत इंद्रिये असतात. उदा. दोन इंद्रिय (स्पर्श आणि स्वाद) वाले जीव आहेत दोड किंवा गांडूळ; तीन इंद्रिय (स्पर्श, स्वाद, गंध) वाले जीव आहेत मुंग्या, चार इंद्रिय (स्पर्श, स्वाद, गंध, दृष्टी) वाले जीव आहेत मधमाशा आणि पाच इंद्रिय (स्पर्श, स्वाद, गंध, दृष्टी, श्रवण) वाले जीव आहेत मनुष्य.

याच्या विपरीत स्थावर जीव असतात. ते गतिहीन आणि अपूर्ण असतात. याच्याजवळ केवळ एकच इंद्रिय असते. जसे वनस्पती. यांना केवळ स्पर्शज्ञानच असते. काही अजीव द्रव्य जीवासाठी शरीर निर्माण करतात तर काही बाह्यवातावरण निर्माण अजीव हे जीवन आणि चेतनारहित असतात. हे जड द्रव्यापासून बनतात. तात. जैन धर्मात अजीव किंवा जड तत्त्वाला पुद्गल असे संबोधिण्यात आले आहे. पुल म्हणजे ज्याचा संयोग व विभाजन होऊ शकते. या तत्त्वानुसार जड द्रव्यांचा योगी होऊ शकतो व त्यांचे विभाजन होऊ शकते. पुद्गलच्या सर्वात लहान अंशाला "अणु' म्हणतात. दोन किंवा दोनापेक्षा ज्यास्त अणुंच्या संयोगापासून स्कंध तयार होतो. आपले शरीर म्हणजे पुगलच्या अणूंपासून बनलेला एक संघात आहे. स्पर्श, रस, गंध आणि वर्ण हे पुगलचे चार गुण मानण्यात आले आहेत. अशा रीतीने जीव-अजीवचा परस्परसंबंध हा शरीर व आत्म्याचा परस्पर संबंधआहे

**अनेकात्मवाद** –

जैन धर्म आत्म्याचे अस्तित्व मानतो परंतु वैदिक धर्माप्रमा सर्व प्राणिमात्रात जसा एकच आत्मा वास करतो म्हणजे एकात्मवाद तो जैन धर्माला मान्य नाही, जैन धर्म अनेक आत्म्यांचे अस्तित्त्व मानतो. या धर्मानुसार प्रत्येक सजीवात वेगवेगळा आत्मा वास करतो. यामुळेच प्रत्येक सजीवाचा आकार व व्यक्तित्व भिन्नभिन असते. सूत्र कृतांगमध्ये या संदर्भात सांगितले आहे की "जर सर्व सजीवात एकच आत्मा असता तर प्रत्येक सजीवाचा रंग, रूप, गतिविधी एकसमान असती.. ब्राह्मण, कुणी क्षत्रिय, कुणी शूद्र, कुणी कीटक, कुणी पक्षी, कुणी सर्प असा प्रकार नसता. एकतर सारे मनुष्य असते किंवा देवता. "

**अनीश्वरवाद** –

बौद्ध धर्माप्रमाणे जैन धर्मानेही ईश्वराचे अस्तित्व नाकारले आहे कारण इंद्रियांद्वारा परमेश्वराचे दर्शन किंवा ज्ञान शक्य नाही. या धर्मात ईश्वरा अस्तित्वाबरोबरच त्याच्या गुणांबाबतही शंका उपस्थित करण्यात आली आहे. ई हा सर्वशक्तिमान आणि म्हणूनच पूर्ण समजला जातो. तो सर्व शक्तिमान असल्याने सर्व वस्तूंचे मूल कारणही मानला जातो. परंतु जैन धर्माला ही बाब मान्य नाही कारण घरात भांडी-कुंडी इ. अशा अनेक वस्तू असतात की ज्या ईश्वरनिर्मित नाहीत. व धर्मानुसार ईश्वर हा सृष्टीचा निर्माता नाही. जगाच्या संवर्धन व संहारासाठी ईश्वराची सत्ता मानणे या धर्माला मान्य नाही. या धर्मानुसार प्रत्येक वस्तू स्वतःच्या गुणांनुसार निर्माण होते व नष्ट होते. जर पदार्थांना ईश्वरी इच्छेनुसारच कार्य करायचे असते सर अग्नी थंडावा देण्याचे व जल जाळण्याचेही कार्य करू शकले असते. या धर्माच्च मते ईश्वर म्हणजे आत्म्याच्या सर्वश्रेष्ठ गुणांची व ज्ञानाची केवळ अभिव्यक्ती वि प्रकटीकरण आहे. यासाठीच जैन धर्मात त्या तीर्थंकरांची पूजा केली जाते ज्यांचे आत सांसारिक बंधनातून मुक्त झाले आहेत.

**'स्यादवाद'**

'स्यादवाद' जैन धर्माचा वैशिष्ट्यपूर्ण सिद्धांत आहे. यानुसा सत् ची अनेक रूपे आहेत आणि त्यांचे स्वरूप इतके जटिल व व्यापक आहे एका वाक्यात त्याची व्याख्या करणे किंवा त्याचा अर्थ समजावून सांगणे कठीण आहे. स्याद् वादमधील स्यात हा शब्द संस्कृतच्या 'अस' (होणे) या धातूचे विकृत रूप आहे. याचा अर्थ होतो बहुधा किंवा शक्यता आहे. जैन धर्मानुसार प्रत्येक वस्तूला भिन्न भिन्न दृष्टिकोनातून पाहता येते आ प्रत्येक दृष्टिकोनातून त्या वस्तूचे भिन्न रूप आपल्याला दिसते. प्रत्येक वस्तचे स्वरूप इतके जटिल असते की त्याबाबतचा कोणताही निष्कर्ष हा अंतिम असू शकत ह तो आंशिकच असतो. म्हणूनच या धर्माच्या मते वस्तूच्या प्रत्येक आंशिक ज्ञानास निष्कर्ष

काढताना सुरुवातीला 'स्यात' या शब्दाचा वापर करायला हवा कारण या शब्दन वापर असा संकेत देतो की त्या विधानाची सत्यासत्यता प्रसंग विशेषवर निर्भर करते कारण एक विधान एका संदर्भात किंवा प्रसंगविशेषी सत्य तर तेच विधान अन्य संदर्भात किंवा प्रसंगविशेषी असत्य असू शकटे. या सिद्धांताचे अधिक स्पष्टीकरण देण्यासाठी जैन ग्रंथात एक हत्ती आणि अनेक आंधळ्याचा दृष्टांत देण्यात आला आहे. या कथेत निरनिराळे आंधळे एकाच हत्तीला सर्श करून त्याच्या आकृतीविषयी निरनिराळे निष्कर्ष काढतात. वास्तविक प्रत्येक आंधळा हत्तीच्या निरनिराळ्या अंगांना स्पर्श करीत असतो. याचप्रमाणे प्रत्येक वस्तूचे स्वरूपही अत्यंत जटिल असते त्यामुळे एका वाक्यात तिचे संपूर्ण वर्णन अशक्य असते. म्हणूनच जैन धर्मात वस्तूच्या वास्तविक रूपाचे वर्णन करण्यासाठी सात उक्तींवर भर देण्यात आला आहे.

१) स्यात अस्ति (संभवता आहे)

२) स्यात नास्ति (संभवता नाही)

३) स्यात अस्ति नास्ति (संभवता आहे किंवा नाही)

४) स्यात अव्यक्तव्यम् (संभवता आहे किंवा नाही )

५) स्यात अस्तिच अव्यक्तव्यम् (संभवता आहे व सांगताही येत नाही)

६) स्यात नास्तिच अव्यक्तव्यम् (संभवता नाही आहे व सांगताही येत नाही)

७) स्यात अस्तिच नास्तिच अव्यक्तव्यम् (संभवता आहे, नाही आणि सांगताही येत नाही)

**ज्ञान –**

जैन तत्त्वज्ञानानुसार ज्ञान हे जीव किंवा आत्म्याचे अंगीभूत लक्षण आहे परंतु कर्मबंधनामुळे आत्मा या अंगीभूत गुणाचा प्रसार करू शकत नाही. जेव्हा बंधन नष्ट होते तेव्हा आत्मा अनंत ज्ञानाच्या प्रकाशात न्हाऊन निघतो. जैन तत्त्वज्ञानानुसार ज्ञान दोन प्रकारचे असते उपरोक्ष आणि परोक्ष ज्ञान. अपरोक्ष ज्ञान आत्मा कर्मबंधनातून मुक्त झाल्यावर प्राप्त होते. या ज्ञानाच्या प्राप्तीमुळे इंद्रियांच्या मदतीशिवाय आत्मा व इतर वस्तूंमधील संबंध ज्ञात होतो. याला पारमार्थिक ज्ञान असेही म्हटले जाते.

परोक्ष ज्ञान म्हणजे मन किंवा इंद्रियांद्वारा वस्तूंचे प्राप्त होणारे ज्ञान. केवल्य. अवघी ज्ञान म्हणजे अगोचर (दृष्टीला न पडणाऱ्या वस्तूंचे ज्ञान) ज्ञान. या अपरोक्ष किंवा परमार्थिक ज्ञानाचे तीन प्रकार आहेत. अवधी, मनःपर्याय आणि जानाला मर्यादा असल्याने याला अवधी ज्ञान असे म्हणतात.इतरांच्या वर्तमान व भूतकाळाचे ज्ञान होणे. यात दुसऱ्याच्या मनात प्रवेश करण्याची मनः पर्याय ज्ञान म्हणजे मनुष्याने स्वतःच्या विकारांवर विजय प्राप्त केल्यानंतर क्षमता असल्याने त्याला मनःपर्याय ज्ञान म्हणतात. कैवल्य ज्ञान म्हणजे ज्ञान प्राप्तीच्या मार्गातील सर्व अडचणी दूर होणे आत्मा कर्मापासून मुक्त होऊन आणि अनंत ज्ञानाचा धनी होणे. हे केवळ मुक्त जीवांनाच प्राप्त होते. याशिवाय परोक्ष ज्ञानाचेही दोन प्रकार आहेत मतिज्ञान जे मन किंवा इंद्रियाद्वारा प्राप्त होते आणि श्रुत ज्ञान जे जैन धर्माच्या श्रवणानी प्राप्त होते.

**निर्वाण**

निर्वाण शब्दासाठी जैन धर्मात कैवल्य हा शब्द वापरण्यात आला आहे. कैवल्य हे जैन धर्माचे अंतिम लक्ष्य मानण्यात आले आहे. जिवाच्या भौतिक अंशाची समाप्ती म्हणजे निर्वाण जोपर्यंत मनुष्य कर्म फळातून मुक्त नाही तोपर्यंत त्याच्यातील भौतिक अंश नष्ट होत नाही. कर्म-फळाचा निरोध केल्यावरच निर्वाण प्राप्त होते. सारांश निर्वाण तेव्हाच प्राप्त होते जेव्हा मनुष्य त्याच्या पूर्व जन्मांच्या कर्मफळातून मुक्त होतो व वर्तमान जन्मातील कर्म फळापासून दूर राहतो. निर्वाण म्हणजे एक प्रकारच्या इच्छा, आकांक्षा व कर्म-फळापासून मुक्त असते. तिच्याठायी अनंत शांती व ज्ञानाचा वास असतो.

जीवन हे भौतिक आणि आत्मिक या दोन परस्परविरोधी तत्त्वांनी व्याप्त असून या दोन्ही तत्त्वांत सतत संघर्ष सुरू असतो. आत्मिक तत्त्व हे मूलतः उर्ध्वगामी आणि भौतिक तत्त्व अधोगामी असते. जोपर्यंत भौतिक तत्त्वाचा प्रभाव असतो तोपर्यंत ने तत्त्व आत्मिक तत्त्वाला खालच्या दिशेने खेचत असते. परंतु जेव्हा निर्वाण प्राप्त होते तेव्हा भौतिक तत्त्व नष्ट होते आणि आत्मिक तत्त्व हळूहळू उत्थान पावू लागते. अशा रीतीने निर्वाण चिर, शाश्वत, शांत आणि उर्ध्वगामिनी असते.

**व्यावहारिक किंवा नैतिक तत्त्वज्ञान -**

**वेदांचा तिरस्कार –**

जैन धर्म वेदांना प्रामाणिक ग्रंथ म्हणून स्वीकारत नाही. हिंदू धर्मात वेदांना ''अपौरूषेय" म्हणजे ब्रह्माच्या मुखातून निघालेले दिव्यवचन म्हणून स्वीकारण्यात आले आहे परंतु जैन धर्मात ईश्वराचे अस्तित्वच नाकारण्यात आले आहे. त्वामुळे ज्यांच्या रचियत्याच्या

अस्तित्वाविषयीच शंका आहे त्यांच्या रचलेल्या प्रधान प्रमाण कसे मानणार. यामुळे जैन धर्मात तीर्थंकरांच्या उपदेशांना व वचनांनाच प्रमाणभूत मानण्यात आले आहे. याच आधारावर जैन ग्रंथांची 'आगम' रचना झाली.

**त्रिरत्न**

जैन धर्मात सम्यक दर्शन, सम्यक ज्ञान आणि सम्यक चारित्र्य यांस - त्रिरत्न म्हटले आहे. उमास्वामी तत्त्वार्थाधिगम सूत्रात लिहितात 'सम्यग्दर्शन-ज्ञान-परिवारि मोक्ष मार्ग. याचा अर्थ सम्यक् दर्शन, सम्यक ज्ञान आणि सम्यक चारित्र्य हेच मोक्षाच मार्ग आहेत. हे तीन संयुक्त रूपाने विद्यमान झाल्यावरच मोक्ष प्राप्त होतो. मध्ये, खऱ्या ज्ञानात श्रद्धा ठेवणे, यात सम्यक दर्शन याचा अर्थ आहे सत् आठ गोष्टींवर भर देण्यात आला आहे.

१) सर्व प्रकारच्या शंकांचे निरसन करणे.
२) सांसारिक सुखाचा मोह टाळणे..
३) आसक्ती आणि विरक्तीपासून दूर राहणे.
४) चुकीच्या मार्गावर न जाणे.
५) अर्धवट विश्वासाच्या भोवऱ्यात न अडकणे.प्राचीन भारताचा इतिहास ३०७
६) खऱ्या विश्वासावर अटळ राहणे. सर्वावर समान प्रेम करणे.
७) जैन धर्माच्या तत्त्वांप्रती संपूर्ण श्रद्धा व विश्वास बाळगणे.
८) सम्यक् ज्ञान याचा अर्थ जीव आणि अजीव यांच्या मूलतत्त्वांचे यथार्थ ज्ञान घेणे, सत् आणि असत् यातील भेद ओळखणे.सम्यक् चारित्र्य याचा अर्थ आहे सत्कर्म आणि सदाचरण वाईट कर्माचा त्याग आणि चांगल्या कर्माचे आचरण म्हणजे सम्यक् चारित्र्य कर्मामुळे बंधन व बंधनामुळे दुःख निर्माण होते. सम्यक् चारित्र्यामुळेच जिवाला कर्मापासून मुक्ती मिळते. यासाठी पंचमहाव्रत, पंचसमिती, दहाधर्म आणि शीलव्रतांचे पालन करायला हवे.

**पंचमहाव्रते**

चारित्र्यनिर्मितीसाठी जैन धर्मात अहिंसा, सत्य, अस्तेय, ब्रह्मचर्य आणि अपरिग्रह ही पंचमहाव्रते सांगितली आहेत.

**१) अहिंसा -**

अहिंसा म्हणजे सजीवांप्रती हिंसेचा त्याग करणे . जैन धर्मानुसार वनस्पतींसारख्या अचल पदार्थ किंवा द्रव्यांमध्येही जीव असतो. यासाठी चल आणि अचल अशा सर्व सजिवांप्रती हिंसेचा त्याग करायला हवा. आपले इतरांप्रती असे आचरण हवे की जसे आपण इतरांकडून स्वतः प्रती अपेक्षित करतो. कारण आज नीच योनीत असलेला जीवही उद्या उच्च योनी प्राप्त करू शकतो. मन, वचन आणि काया किंवा कर्माद्वारे अहिसा व्रतांचे पालन करायला हवे. यासाठी दुसऱ्याचे वाईट नचितणे, कटू व कठोर भाषण न करणे आणि कर्म करताना जिवाची हत्या होणार नाही याची काळजी घ्यावी.

**२) सत्य** –

यात असत्य भाषणाचा त्याग करण्यावर भर देण्यात आला असून सर्वांना प्रिय आणि सर्वांचे कल्याण करणाऱ्या सत्य भाषणाला आदर्शवत मानण्यात आले आहे. सत्य भाषण करताना मनुष्याने भय, क्रोध, लोभ तथा इतरांची कुचेष्टा याचा त्याग करायला हवा.

**३) अस्तेय** –

जैन धर्मात कोणत्याही संपत्तीला प्राणाप्रमाणे पवित्र मानण्यात आले आहे. यासाठी अस्तेय म्हणजे कारण नसताना इतरांच्या वस्तूंचा स्वीकार न पद्रव्य हरण करणे म्हणजे हिंसात्मक कार्य मानले गेले आहे.

**४) ब्रह्मचर्य**

सर्व प्रकारच्या वासनांचा त्याग करणे म्हणजे ब्रह्मचर्य ब्रह्मचर्याचे पालन करण्यासाठी सर्व प्रकारच्या इच्छांचा मग त्या मानसिक, शारीरिक, स्थूल, सूक्ष्म, ऐहिक, पारलौकिक कोणत्याही प्रकारच्या असो. विवाहापूर्वी परस्त्रीगमन पाप आहेच. परंतु विवाहानंतरही स्वतःच्या पत्नीशिवाय इतर स्त्रियांविषयी पापवासना बाळगू नये.. नावाने ब्रह्मचर्यावर विशेष भर दिला नाही परंतु महावीराने ब्रह्मचर्य व्रताला पंचमहाव्रतांमध्ये स्थान दिले.

**५) अपरिग्रह** –

मनुष्य हा स्वभावतः समाधानी आहे. अन्न, वस्त्र इत्यादी भौतिक गोष्टींचा कितीही संग्रह केला तरी त्याचे समाधान होत नाही. भौतिक वस्तूंची हाव किंवा आसक्ती त्याला कर्मबंधनात जास्तीत जास्त जखडून ठेवत. कर्मबंधनामुळे मनुष्याला वारंवार जन्म घ्यावा लागतो.

त्यासाठी त्याला अशा सर्व गोष्टींचा संग्रह टाळायला हवा किंवा त्याग करायला हवा की ज्यापासून त्याला इंद्रियसुख मिळते. इंद्रियसुखात शब्द, स्पर्श, रूप, स्वाद, गंध इत्यादी सर्वच गोष्टींचा समावेश होतो.. मोक्षप्राप्तीसाठी इंद्रियसुख देणाऱ्या गोष्टींचा त्याग करून अपरिग्रहाद्वारे विषयवासनेपासून अनासक्त राहायला हवे.

**सात शीलव्रत –**

जैन धर्माचे सर्वार्थाने पालन करता यावे म्हणून गृहस्थांसाठी वेगवेगळे नियम बनविण्यात आले आहेत. यात सात शीलवत महत्त्वाचे आहेत

१) दिग्व्रत - स्वतःच्या क्रियांना काही विशिष्ट दिशांपुरतेच सीमित ठेवणे

२) देशव्रत - स्वतःच्या क्रियांना विशिष्ट स्थानांपुरतेच सीमित ठेवणे.

३) अनर्थदंडव्रत - अकारण अपराधांचा भागीदार न होणे.

४) सामायिक स्वविचार यासाठी स्वतःचा काही वेळ देणे.

५) प्रोषधोपवास- प्रत्येक महिन्यातील अष्टमी आणि चतुर्दशीला उपवास करणे.

६) उपभोग प्रतिभाग परिणाम दैनंदिन उपभोगाच्या वस्तू मर्यादित ठेवणे,

७) अतिथीसंविभाग - घरी आलेल्या अतिथीलाच भोजन दिल्यानंतर स्वतःभोजन करणे.

**अणुव्रत –**

गृहस्थाश्रमी मनुष्याला जैन धर्माच्या तत्त्वांचे पालन करण्यात काही सूट देण्यात आली आहे. सर्वसामान्यांसाठी करण्यात आलेल्या नियमांचा आधार पंचमहावत असला तरी त्यांना त्यात काही सवलती देण्यात आल्या आहेत. म्हणूनच त्यांना अणुव्रत म्हणतात.

१) अहिंसाणुव्रत - शक्यतोवर हिंसेचे पालन करू नये.

२) सत्याणुव्रत - जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात सत्यांचे अनुसरण करण्याचा प्रयत्न करणे.

३) अस्तेयाणुव्रत - इतरांच्या कार्यात ढवळाढवळ न करणे.

४) ब्रह्मचर्याणुव्रत परस्त्रीचा विचार न करता गृहस्थ धर्मातही संयम पाळणे.

५) अपरिग्रहाणुव्रत - स्वतःच्या गरजेनुसार धनसंचय करणे. करण्यासाठी जैन धर्मात

**पाच समित्या**

गृहस्थ जीवनातील मर्यादांचे पालन पाच समित्यांच्या पालनावर भर देण्यात आला आहे.

१) ईर्ष्या समिती - मार्गक्रमण करीत असताना जिवांना कष्ट न देणे.

२) भाषा समिती - कुणाप्रतीही कठोर वचनांचा प्रयोग न करणे.

३) एषणा समिती खानपानात जीवहत्या होणार नाही याची काळजी घेणे.

४) आदान निश्रेप समिती वस्तूचा वापर करताना जीवांप्रती दया राखणे.

५) उत्सर्ग समिती - लघुशंका आणि दीर्घशंकेद्वारे घाण न पसरविणे. या समित्या गृहस्थाद्वारे अहिंसाव्रताचे पालन व्हावे म्हणून निर्धारित करण्यात आल्या होत्या.

**स्त्री स्वातंत्र्य –**

जैन धर्मात आध्यात्मिक विकासासाठी स्त्रियांना पुरुषांप्रमाणेच स्वातंत्र्य बहाल करण्यात आले आहे. पार्श्वनाथ आणि महावीर दोघेही स्त्री स्वातंत्र्याचे पुरस्कर्ते होते. यामुळेच अनेक स्त्रियांनी जैन धर्माची दीक्षा घेतली. श्रमणी आणि श्राविका या दोन वर्गाची जैन संघात स्थापना करण्यात आली.

**दिगंबर वृत्ती-**

पार्श्वनाथांनी आपल्या अनुयायांना वस्त्र धारण करण्याची अनुमती दिली होती परंतु महावीरांनी दिगंबर वृत्तीचे समर्थन केले. त्यांच्या शिकवणुकीनुसार आसक्ती आणि लज्जा यांचा त्याग करून आत्मबल आणि घोर तपश्चर्या करण्यासाठी, बल प्राप्त करण्यासाठी दिगंबर वृत्ती धारण करणे आवश्यक आहे. दिगंबर वृत्ती धारण केल्याने मनुष्य लज्जा, परिग्रह व शारीरिक कष्टांचा त्याग करून आध्यात्मिक उन्नतीचे शिखर गाठू शकतो.